मागासवर्गीयांसाठी शासकीय सेवेतील आरक्षण -- आरक्षित पदांसाठी मागासवर्गीय उमेदवार एखाद्या वर्षी उपलब्ध नसल्यास पुढील वर्षात वाढीव आरक्षण लागू करणे ..

वर्षभरात उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांपैकी किती पदे आरक्षित समजली जावीत याबाबतचे निर्णय --

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक बीसीसी १०७८/८३१/१६ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ एप्रिल १९८१.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७० (ईसीआर)-जे, दिनांक २८ मे १९७१.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७२ ईसीआर/जे, दिनांक २७ जून १९७४.

निर्णय:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७०/(ईसीआर)-जे, दिनांक २८मे १९७१, अन्वये असे आदेश देण्यात आले होते की, मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदांपैकी काही पदांवर एखाद्या वर्षात जर मागासवर्गीय उमेदवारांची नियुक्ती होऊ शकली नाही तर तेवढी पदे पुढील पांच वर्षांपर्यंत आरक्षण म्हणून पुढे नेली ( carry forward ) जावीत. मात्र अशा प्रकारची पुढे नेलेली आरक्षित पदे व रोस्टरप्रमाणे नव्याने आरक्षित ठरलेली पदे यांची एकत्र संख्या कोणत्याही सेवा भरतीच्या प्रसंगी भरावयाच्या एकूण पदांपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये.

२. सर्वोच्च न्यायालयाने केरळ राज्य व इतर विरुद्ध एन्. एम्. थॉमस व इतर या खटल्यात दिलेल्या निवाड्याच्या अनुषंगाने याबाबत केंद्र शासनाने काढलेल्या आदेशाप्रमाणेच ही ५० टक्क्यांची मर्यादा वाढविता येईल किंवा कसे हा प्रश्न विचाराधीन होता. पूर्वीच्या वर्षामध्ये भरल्या न गेल्यामुळे पुढे नेण्यात आलेल्या ( carried forward ) आरक्षित पदांची मोठी संख्या विचारात घेता शासन असे आदेश देत आहे की, यापुढे सेवाभरतीच्या कोणत्याही एका प्रसंगी पुढे नेलेली (carried forward) आरक्षित पदे व नव्याने आरक्षित ठरलेली पदे यांची बेरीज उपलब्ध असलेल्या एकूण पदांच्या संख्येच्या ५० टक्क्यांहून अधिक होत असली तरीही अशी सर्व पदे मागासवर्गीयांच्या नियुक्तीसाठी आरक्षित म्हणून वापरण्यात यावीत. मात्र अशा नियुक्तीमुळे संबंधित संवर्गातील मागासवर्गीयांची, विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त आणि भटक्या जमाती या सदरात मोडणाऱ्या व्यक्तींची संख्या त्या त्या संपूर्ण संवर्गात अशा व्यक्तींसाठी विहित केलेल्या आरक्षणाच्या प्रमाणापेक्षा अधिक होता कामा नये. एकदा आरक्षणाचे विहित प्रमाण भरले गेले की, त्या नंतरच्या रिक्त जागा भरताना नेहमीची, म्हणजे सरळ सेवा प्रवेशासाठी १०० अंकी रोस्टरप्रमाणे व पदोन्नतीसाठी ५० अंकी रोस्टरप्रमाणे मागासवर्गीयांसाठी आरक्षित व इतरांसाठी अनारक्षित पदे भरण्याची पद्धत चालू राहील.

पृ. मा. प.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७२/इसीआर/जे, दिनांक २७ जुन १९७४ अन्वये करण्यात आलेली तरतुदही शासनाने वरील संदर्भात विचारात घेतली. या तरतुदीनुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व विमुक्त आणि भटक्या जमातीचे निव्वळ गुणवत्तेवर अनारक्षित म्हणून निवडलेले उमेदवार आणि मागासवर्गीय म्हणून आरक्षित पदांसाठी निवडलेले उमेदवार यांची एकूण संख्या एकूण उपलब्ध पदांच्या संख्येच्या ४०% पेक्षा जास्त असू नये असे आदेश देण्यात आले होते. वरील आदेश रद्द करुन शासन आता असे आदेश देत आहे की, निव्वळ गुणवत्तेवर निवडल्या गेलेल्या अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व विमुक्त आणि भटक्या जमातीच्या उमेदवारांची नियुक्ती आरक्षित पदांचा हिशेब करताना विचारात घेण्यात येऊ नये.

४. सेवाभरतीमधील मागासवर्गीयांची तूट त्वरित भरुन काढण्यासाठी या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

न. वे. सुंदररामन,
विशेष सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती, नवी दिल्ली,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
निवासी लेखाधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
कामगार आयुक्त व सेवायोजन संचालक, मुंबई,
इतर सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग,
मंत्रालयाचे इतर सर्व विभाग.

* पत्राने.

------